महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९१४ ०२२-६१३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एलटीडी-३४१७/सीआर-१४/२०१७/जाहिरात

दिनांक : ०१ सप्टेंबर, २०२३

## -: शुद्धिपत्रक :-

**विषय :- सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा – २०२३, जाहिरात क्रमांक ३२/२०२३, परीक्षेच्या आयोजनाबाबत**

जाहिरात क्रमांक ३२/२०२३, दिनांक १४ जून, २०२३ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा – २०२३ करीता नियोजित परीक्षा **शनिवार, १६ सप्टेंबर, २०२३** ऐवजी खालीलप्रमाणे फक्त मुंबई येथे संगणक प्रणालीवर आधारित पद्धतीने आयोजित करण्यात येईल :-

| जाहिरात क्रमांक | परीक्षा | नियोजित वार व दिनांक | परीक्षेकरीता सुधारित वार, दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| ३२/२०२३ | सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा - २०२३ | शनिवार<br>दिनांक १६ सप्टेंबर, २०२३ | रविवार, २४ सप्टेंबर, २०२३<br>पेपर - १ सकाळी ८.३० ते ९.३०<br>पेपर -२ सकाळी ११.३० ते १२.३० |

२. आयोगामार्फत दिनांक १४ जून, २०२३ रोजी विषयांकित संवर्गाच्या एकूण ४७ पदांकरीता जाहिरात प्रसिद्ध केल्यानंतर शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: मविप-१४२२/प्र.क्र.१६३/१४-अ, दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ अन्वये सहायक कक्ष अधिकारी संवर्गाचे अतिरिक्त १३ पदांचे मागणीपत्र प्राप्त झाले आहे. त्यामुळे सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा - २०२३ मधून केवळ गुणवत्तेनुसार **एकूण ६०** पदांकरीता भरतीप्रक्रिया राबविण्यात येईल. वाढीव पदसंख्येच्या अनुषंगाने प्रस्तुत परीक्षेकरीता दिव्यांग उमेदवारांकरीता एकूण आरक्षित पदांची **सुधारित पदसंख्या** खालीलप्रमाणे राहील :-

| दिव्यांगांकरीता आरक्षित सुधारित पदसंख्या | आरक्षित दिव्यांगत्वाचा प्रकार/उपप्रकार |
|---|---|
| एकूण ४ पदे - | **०१ पद**- अंध / अल्पदृष्टी (Blind / Low Vision), **०१ पद** - कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता (Deaf / Hard Hearing) **०१ पद** - अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy, **०१ पद *** - स्वमग्नता (Autism) / मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific Learning Disability) / मानसिक आजार (Mental Illness) तसेच बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व] |
| * अनुशेषाचे पद | |

३. मंत्रालयीन विभागातील सहायक कक्ष अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) पदावर निवडीने नियुक्ती मर्यादित विभागीय स्पर्धा नियम, २०२२ दिनांक ०१ जून, २०२२ मधील नियम क्रमांक ३(अ) च्या परंतुकानुसार परीक्षेच्या जाहिरातीच्या दिनांकास विभागीय चौकशी प्रलंबित असलेले लिपिक-टंकलेखक सदर परीक्षेस बसण्यास अपात्र असतील.

४. दिनांक १४ जून, २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमधील इतर अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल नाही.

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई